
(12)

विद्यापीठ अनुदान आयोग, दिल्ली व
स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड यांच्या सौजन्याने

**एक दिवसीय राष्ट्रीय परिषद**

दि. १८/०९/२०१७




# नव्वदोत्तरी मराठी कविता

NANDED

आयोजक

श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटीच

The Best College Award by SRTMU, Nanded
College with Potential for Excellence (status awarded by U.G.C)
NAAC Reaccredited 'A' GRADE (third Cycle 2013)
An ISO 9001:2008 Certified College &
DST-FIST Sponsored College

संपादक

३६. ' मराठवाडयातील नव्वदोत्तरी कवितेतील ग्राम संस्कृतीचे चिंतन एक अभ्यास' – प्रा.डॉ. मंजुषा वि. भटकर १८३
३७. नव्वदोत्तरी मराठी कवितेवर पडलेला जागतिकीकरणाचा प्रभाव – डॉ. विजया खामनकर १८६
३८. जागतिकीकरण आणि मराठी महानगरीय कविता – प्रा. डॉ. रामकिशन दहिफळे १८८
३९. बांडा हंगाम मधील शेतकऱ्यांच्या हालअपेष्टा – प्रा. मधुकर जाधव १९३
४०. नव्वदोत्तर मराठी कविता : राजकारण व सत्ताकारणाची प्रखर भाष्यकार – प्रा.डॉ.अजय वसंतराव गव्हाणे १९६
४१. २००० नंतरच्या काळखंडातील ऊर्जावान कवी : अक्षय घोरपडे – प्रा.डॉ. विजयेंद्र विश्वनाथ पाटील १९९
४२. गावशिवाराचा वास्तव जीवनपट : गावशिव – प्रा.प्रशांत भंडे २०२
४३. नागर जीवन व्यक्त करणारी अशोक कोतवालांची कविता – प्रा. संभाजी बाबाराव सावंत २०५
४४. १९९० नंतरच्या कवितेतील स्त्रियांचे भावविश्व – डॉ. दीपक सुभाषराव सूर्यवंशी २०७
४५. नव्वदोत्तरी मराठी कवितेत आलेले लोकप्रशासनाचे चित्रण – प्रा.डॉ. गिरा विठ्ठलराव फड २०९
४६. नव्वदोत्तरी मराठी कवितेतील दलित जाणिवा – डॉ. अनिल व्यंकटराव मुंढे २११
४७. झेपावणाऱ्या पंखातून चित्रित झालेल्या विद्रोही कविता – डॉ. सविता अशोक व्हटकर २१४
४८. काव्यात शास्त्रीय संगीताचे स्थान (इ.स.१९९० च्या व नंतरच्या चालींचा आढावा) – प्रा.सौ.संगीता रमाकांत चाटी २१९
४९. अशोक कौतिक कोळी यांच्या गावकडच्या कविता – प्रा. डॉ. ज्ञानदेव राऊत २२१
५०. नव्वोत्तरी मराठी कविता – प्रा.डॉ.लक्ष्मण वाघमारे २२८
५१. प्रकाशवाटा काव्यसंग्रहातील जाणिवा... – प्रा.डॉ. जयद्रथ जाधव २२९
५२. 'आदिवासींच्या लिलावाचा प्रजासत्ताक देश' या काव्यसंग्रहातील गुलामीचे चित्रण – प्रा. एस. जी. खुपसे २३१
५३. शंकर वाडेवाले यांच्या कवितेतील बदलते ग्रामवास्तव – प्रा. डॉ. सूर्यप्रकाश वैजनाथराव जाधव २३४
५४. नव्वदोत्तरी आंबेडकरवादी कवितेतील सार्वत्रिक विषमता व क्रांतिसन्मुखतेची जाणीव – प्रा. डॉ. भास्कर विठ्ठलराव नरवाडे २३७
५५. दया पवार यांच्या कवितेतील स्त्रीदर्शन – प्रा.डॉ. एस.बी. शिंदे २४१
५६. १९९० नंतरची भालेरावांची विद्रोही कविता – डॉ. सौ. जयदेवी पवार २४४
५७. नव्वदोत्तरी मराठी ग्रामीण कविता – डॉ. चंद्रकांत शेरखाने २४८
५८. कवी विठ्ठल वाघ यांच्या 'खापराचे दिवे' या कवितेतील समाजवास्तव आणि प्रतिमाविश्व – प्रा.नरेंद्र जनार्दन पाखरे २५२
५९. जीवन संघर्षाचा शोध घेणारी कविता : 'माय आणि हुंदके' – प्रा. नारायण शिवशेट्टे २५६
६०. ''नव्वदोत्तरी मराठी स्त्रीवादी कविता'' – उज्वला रुपचंद राजगुडे २६२
६१. 'स्व' जाणिवेची कविता – डॉ. मारोती कोल्हे २६५
६२. 'बळीवंत' म्हणजे शेतकऱ्यांच्या दुःखाची गाथा – प्रा. संगीता मुंढे २७०
६३. १९९० नंतरची इंद्रजित भालेराव यांची कविता -- प्रा. डॉ. संजय जगताप २७३
६४. उत्कट भावनांचा आविष्कार – पाथेय – प्रा. लालबा चां. दुस्टकर २७८
६५. अनुराधा पाटील यांच्या कवितेतील स्त्रीवादी जाणीवेचे स्वरूप प्रा. नामदेव वाघमारे २८२
६६. समकालीन वास्तव,जागतिकीकरण आणि नव्वदोत्तरी मराठी कविता – माधव हैबतकर २८५
६७. नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कवितेतील कृषी वास्तव – प्रा. रवींद्र दे. डाखोरे २८९
६८. 'भारेकरी जेव्हा मातीला येतात' मधील नवजाणिवा – डॉ.लहू दिगंबर वाघमारे २९२
६९. नवदोत्तरी मराठी कवयित्रींच्या कवितेतील जागतिकीकरणाचे चित्रण – प्रा.डॉ. ममता इंगोले (महल्ले) २९८
७०. अस्वस्थ काळाच्या वेदना व्यक्त करणारा कवी : फ. म. शहाजिंदे – प्रा. मुतवल्ली मैजोद्दीन मैनोद्दीन ३०५
७१. नव्वदोत्तर ग्रामीण कवितेतील बदलते सामाजिक जीवन : एक दृष्टिक्षेप – प्रा.डॉ.आर.डब्ल्यू. नवघडे ३१०
७२. 'सीताराम मास्तरचं अगतिकीकरण' – अरुण काळे ( कवितासंग्रह : नंतर आलेले लोक ) – प्रा.डॉ. यशपाल भिंगे ३१६
७३. नव्वदोत्तरी मराठी महानगरीय कविता – प्रा. कविता पाटील ३१८
७४. नव्वदोत्तरी मराठी कविता आणि बदलते सामाजिक संदर्भ – प्रा. डॉ. हरिदास देविदास आखरे ३२०

 ISBN : 978-81-923487-5-9

Scanned with OKEN Scanner

## १९९० नंतरच्या कवितेतील स्त्रियांचे भावविश्व

डॉ. दीपक सुभाषराव सूर्यवंशी
(शि.म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय)
कळंब जि. उस्मानाबाद.

साहित्य व समाज यांचा प्रवाह समांतर असा आहे. मानवी जीवनाला सर्वाधिक जवळचा असणारा साहित्य प्रकार म्हणजे कविता. कथा, कविता, कादंबरी नाटक व चरित्र अशा साहित्य प्रकारातून सातत्याने मानवी जीवनाविषयी चिंतन केले जाते. असे असले तरी अधिकाधिक प्रमाणात राजकीय, सांस्कृतिक, भौतिक जीवनाविषयी कवितेतून अनेक कवींनी मांडणी केल्याचे दिसते भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि खऱ्या अर्थाने सर्वच क्षेत्रात परिवर्तनाची नांदी सुरू झाली. मराठी साहित्यात स्वतंत्र असे साहित्यप्रवाह निर्माण झाले. यामध्ये आदिवासी, ग्रामीण, दलित, जनवादी व स्त्रीवादी यांचा प्रामुख्याने समावेश होतो. स्वतंत्रपणे स्त्रीवादी चळवळ गतिमान झाली. भारतीय समाजव्यवस्थेतून स्त्रियांना दुय्यम दर्जा व स्थान दिले गेले. याचा परिणाम म्हणून स्त्रीवादी साहित्यातून स्त्रियांचे हक्क, कर्तव्य, समानसंधी, समान विचार व लेखन स्वातंत्र्य, शिक्षण–नोकरी व आरक्षण या विविध सामाजिक न्यायासाठीची चळवळ म्हणून विकसित होत गेली. खऱ्या अर्थाने आत्मसन्मान व व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार या माध्यमातून करण्यात आला. परंपरागत समाजव्यवस्थेला स्त्रियांनी स्वतंत्र अस्मितेविषयी प्रश्न विचारला. अनेक प्रश्नांची उकल व जाणिवांसाठी स्त्रियांना कविता हा साहित्यप्रकार अधिक व्यापक वाटला. एकेठिकाणी परिस्थिती विरुद्ध लढा देण्यासाठी, बंडाची भाषा पहिल्यांदाच करणारी स्त्री म्हणते,

का फक्त आम्हीच कुलशील जपायच?
का फक्त आम्हालाच बंधन लक्ष्मण रेषेचं? – आशा भिडे

जगात श्रेष्ठ असणाऱ्या पण स्त्रियांच्या बाबतीत विषमता निर्माण करणाऱ्या पुरूषप्रधान समाजव्यवस्थेला आपल्या 'स्व' संरक्षणाविषयी, अस्मितेविषयी जेंव्हा एखादी कवयित्री गीतांजली सुकळकर आपल्या 'कात टाकलीय आता' या कवितेत.. .

सावधान,
कात टाकलीय आता
अडगळीतल, कडेकपारितले
पडक्या, जुन्या हवेल्यांचे
गडगडणाऱ्या गढ्यांचे
आश्रय त्यागलेत मी आता ...

याच प्रतिकुल परिस्थितीवर मात करण्याची भूमिका व्यक्त करताना कवयित्री पद्मा गोळे आपल्या 'मी घरात आले' कवितेत.

आता सोंग पूरे झाली,
उतरून ठेवून आता तरी
तुकडे तुकडे जमवू दे
मोकळा श्वास घेऊ दे,
घेत घेत जाऊ दे!

स्त्रियांची व्यापक भावना, प्रस्थापित व्यवस्थेला कडाडून विरोध करणारी कृती, पुरुषसत्ताक संस्कृ आजवर सहन केला परंतू घटनेप्रमाणे शिक्षण, नोकरी, आरक्षण, इ. क्षेत्रात समान संधी, दर्जा व प्रतिष्ठा मि कठोर भाषा स्त्रीवादी चळवळीच्या कवितेतून व्यक्त झाली आहे.

एकीकडे सर्वच क्षेत्रात विज्ञानवादी सुधारणेचे वारे वाहत आहे. मात्र माझ्या घरात आजही समतेचा याच कालखंडात स्त्रीवादी भूमिकेतून मांडणी करणाऱ्या हिरा बनसोडे, अश्विनी धोंगडे, रजनी परुळेकर, अनु आम्मर शेख, संजीवनी मराठे, आसावरी काकडे, प्रज्ञा पवार, वृषाली किन्हाळकर, सुमती लांडे, नीरजा कितीतरी स्त्रिया याच अनुषंगाने आपल्या महानगर कवितेत बाईचे 'बाई' असणे नाकारून दुसरीकडे पुरुषाशिवा असे सामाजिक व्यवस्थेने परिस्थिती निर्माण केल्याने यावर कवयित्री म्हणते,

''शहरातल्या आणि जगातल्या बायका<br>
विचारात पडल्यात असं चित्र<br>
आवडणार नाही कुणालाच<br>
त्या एक प्रियकराच्या बाहुपाशात असतात<br>
किंवा व्हीनसची असतात<br>
हात तोडलेली नग्न सुंदरी असतात''

बऱ्याचदा स्त्री आपल्या भावविश्वाचा, अस्मितेचा शोध घेताना तिची, मानसिक, शारीरिक, भावनिक आपल्या अवतीभोवतीच्या अनुभवातून स्त्री असण्याचा अर्थ कवितेत आसावरी काकडे रेखाटताना दिसतात,

''एक स्त्री दुखा वेचते आहे<br>
तिच्या मनात आजच्या स्वयंपाकाचा मेनू ठरतो आहे<br>
तिला बहुधा एकविशी गाठायची<br>
आणि सव्वानऊची बस सुद्धा<br>
तिने हाताचा वेग वाढवलाय

स्त्रियांची कविता मानसिक व समूहमनाची व्यथा विशद करणारा सामाजिक विषमतेवर भाष्य करताना दिस नातेसंबंध व स्त्री–पुरुष संबंधावर आधारलेली कवयित्री नीरजा यांची कविता,

समाजव्यवस्थेत स्त्रियांचा प्रवास दुखातून हजारो वर्षापासूनच एक माणूस म्हणून तिची भूमिका या साहित आहे. स्त्रीवादी कविता अनेक विचारांचे वादळ विशद करणारी मुक्तछंदावर आधारीत आहे. स्त्रीवादी चळवळीनी निर्मि असमतोल आचरणातून निर्माण पुरुषांना विरोध किंवा परिस्थितीला न्याय मागणे यातून स्त्रीवाद उदयास आलेला आहे.

संदर्भग्रंथ :

नीरजा, कविता मुंबईच्या, प्रकाशक य.च.म.मु.विद्यापीठ, नाशिक.

सरकटे सदाशिव, १९८० नंतरची स्त्रीवादी कविता, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.

खंदारे उषा, (संपा.), कविता स्त्री जाणिवेच्या, गोदा प्रकाशन, औरंगाबाद.

 ISBN : 978-81-923487-5-9

Scanned with OKEN Scanner